Vol 3 Issue 9 June 2014

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

## Welcome to Review Of Research

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *मराठीतील स्त्री लेखिकांच्या विज्ञान कथा*

***श्रुतीश्री वडगबाळकर***

मराठी विभाग प्रमुख ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

***सारांश :-***

मराठी साहित्यातील वाङ्‌मयाचे वेगवेगळे प्रवाह आहेत. ग्रामीण साहित्य दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य असे अनेक प्रवाह 1945 नंतर मराठी साहित्यात दृढ झाले. त्यातच विज्ञानवादी साहित्याचा समावेश करावा लागेल. विज्ञानावर आधारित साहित्य, त्यात प्रामुख्याने कथा व कादंबरी हे वाङ्‌मयप्रकार जास्त आहेत. हे सुरवातीपासून अत्यल्प प्रमाणात लिहिले गेले पण साधारण 1975 नंतर या प्रवाहातील लेखन वाढले आहे. यात माहितीपर आधारित चरित्रात्मक, ज्ञानात्मक साहित्य ही आहे. पण कादंबरीपेक्षा विज्ञान कथा अधिक मोठ्या प्रमाणात लिहिल्या आहेत. आणि त्या लोकप्रिय ही होत आहेत.

***प्रस्तावना :***

विज्ञान साहित्य म्हणजे काय याविषयी मराठी वाङ्‌मय कोशात म्हटले आहे की विज्ञान साहित्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविले जातात. शिवाय भविष्यकाळाचा वेधही घेण्यात येतो. साधारणतः वैज्ञानिक सूत्र किंवा आवष्कार हा ज्याचा आत्मा आहे अशा ललित साहित्याला विज्ञान साहित्य म्हटले जाते. विज्ञान साहित्य काळानुरूप अधिकाधिक विकसित होत गेले तशी त्याची व्यापकताही ठोस व सुस्पष्ट होत गेली.

पाश्चात्य साहित्यात विज्ञान साहित्याची प्रगती लक्षणीय आहे. ह्युगो गर्न्सबॅक यांनी विज्ञान साहित्याची व्याख्या अशी केली आहे. ज्या सुरस ललित साहित्यात विज्ञानातील नवीन आविष्कारांचा व्यक्ती, समाज किंवा अखिल मानवजात यांच्या जीवनावर, जीवनशैलीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा आढावा घेतला आहे. ते विज्ञान साहित्य.

मराठीतील वैज्ञानिक साहित्यावर पाश्चात्य साहित्याचा फार मोठा प्रभाव दिसतो. पाश्चात्य साहित्यात जॉन कॅबेल हे विज्ञान कथांचे आद्य संपादक मानले जातात. ते विज्ञान साहित्याविषयी म्हणतात, 'विज्ञानाच्या नवीन अविष्काराची सुबोध, प्रसादिक भाषेत उकल करत त्याचा यंत्र सृष्टीवरच नव्हे तर मानव समाजावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचे विवेचन कथारूपात करते ते विज्ञान साहित्य होय. मराठीत सुरवातीच्या काळात लिहिलेले साहित्य याच स्वरूपाचे होते. भालबा केळकर, भा. रा. भागवत, नारायण धारप, द.पां. खांबेटे यांच्या कथा याच प्रकारच्या होत्या.'

विज्ञान साहित्यात मानवी व्यवहाराला अधिकाधिक महत्व असतेच. हे साहित्य मानव केद्रिंत असावे. मानवी समस्यांची उकल या साहित्याने करावी. शोधलेले उपाय विज्ञानाधिष्ठित असावे. अशी या साहित्याकडून अपेक्षा असते. विज्ञानातील नवनवीन प्रयोगामुळे कधी कधी व्यक्ती व समाजामध्ये जीवनसंघर्षही येऊ घातले आहेत. त्याचेही चित्रण या साहित्यात येते.

ज्ञान आणि विज्ञान यांचा परस्परसंबंध आहे. तसा विज्ञानाचा व जीवनाचाही अनोन्य संबंध आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुकर होण्यासाठीच असतो. विज्ञान हे प्रयोगावर, वास्तवावर, सत्यावर, तथ्यावर आधारित असते. तर साहित्य हे कल्पनेवर, तर्कावर भावनेवर आधारित असते. असे असेल तरी मानव हा दोघांचाही केंद्रबिंदू आहे. माणसे केवळ शरीरांच्या गरजावर नाही जगू शकत. तर त्याला मनाचा ही फार मोठा आधार असतो. याच मनाचा भावनेचा विचार साहित्य करते. आज कल्पनेत, स्वप्नात रमण्यापेक्षा वास्तवात काय आहे हे जाणून घेण्याची इच्छा वाढते आहे. आपल्या जीवनापेक्षा इतरांच्या जीवनासंबधी कुतूहल निसर्गतः माणसांना असते. नवनवीन शोध विज्ञानात लागत आहे. विज्ञानाच्या शोधाचा हेतू माणसाचे जीवन सुखी व आनंदी करण्याचाच असतो. पण त्या शोधाचा वापर माणूस आपल्या बुद्धीच्या

साहाय्याने वेगवेगळ्या प्रकारे करू लागतो. त्याचा परिणाम व्यक्तीच्या आयुष्यावर तर होतोय. पण समाजावर ही होत असतो. ललित साहित्य जसे नवनिर्मिती करते तसेच विज्ञानही करत असते. ही नवनिर्मिती पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांशी जशी निगडीत असते. तशी माणसाच्या बुद्धी, विचार, शरीर यांच्याशी सुद्धा असते. साहित्य ही असेच असते. विज्ञान साहित्यात या दोन्ही गोष्टीचा संगम असतो. ते विज्ञानाबरोबर माणसाच्या रोजच्या जगण्याचा ही विचार करते. विज्ञान नवे शोध लावतो. त्याचे दृश्य परिणाम विज्ञानाने सिद्ध करता येतात. पण अदृश्य परिणाम अनेक प्रकारचे असतात. ते जाणवतात. पण सिद्ध करता येत नाही. त्याचा परिणाम जाणवतो पण दाखवता येत नाही. विज्ञानाच्या अशा अदृश्य परिणामांची दखल विज्ञानसाहित्य घेत असते. एक प्रकारे ते मानवाला जागरूक करत असते. त्यामुळे अलिकडे हे साहित्य जास्त लोकप्रिय होत आहे. मग विज्ञानातील शोध आरोग्याच्या बाबतीत असतील. खगोलीय असतील, भूगर्भाचे असतील. समुद्री जीवनाचे असतील कशाही प्रकारचे, कोणतेही असतील, त्या शोधाचा विचार, उपयोग, परिणाम साहित्याद्वारे सामान्य लोकांपर्यंत नेता येतात. विज्ञान साहित्य मानवी आविष्कारांशी मिळते जुळते असते.

विज्ञान साहित्याची काही वैशिष्ट्ये आहेत. विज्ञान साहित्य मानवी व्यक्ती किंवा समाज यांच्या आशा आकांक्षा, सुखदुःखे, जयपराजय यांच्या जवळ आल्यामुळे साहित्यिकांच्या सांस्कृतिक वारशांचे प्रतिबिंब त्यात उमटते. विज्ञान साहित्य जरी वैश्विक स्वरूपाचे असले तरी या साहित्यावर भाषा, प्रदेश, वंश यांचा ठसा उमटतोच. मराठी विज्ञान साहित्यातून मराठमोळ्या संस्कृतीचे स्पष्ट प्रतिबिंब दिसते. जयंत नारळीकर, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, शुभदा गोगटे, रेखा बैजल, माधुरी शानबाग या सर्वाच्या साहित्यात मराठी समाजाचे संस्कृतीचे दर्शन घडते.

आजही वैज्ञानिक शोध संशोधन सतत होत आहे. विशेष म्हणजे संगणक, इंटरनेट, टी.व्ही., मोबाईल, आयपॅड या सारख्या माध्यमातून हे संशोधन तात्काळ सर्वापर्यंत पोहचत आहे. विज्ञान साहित्यातून वैज्ञानिक शोधाची संशोधनाची माहिती सर्वसामान्यापर्यंत जात असते. प्रत्येक व्यक्तीचा जीवनानुभव हा विज्ञानप्रवण परिस्थितीशी जोडलेला आहे. असे डॉ. रमेश देवरे म्हणतात. पंचवीस–तीस वर्षापूर्वीच्या विज्ञानधिष्ठित संभवनीय कल्पना आज विज्ञानातील वास्तव झाले आहे. साहित्याचा प्रभाव हा समाजावर नेहमीच पडत असतो. तसेच समाजाचा प्रभाव साहित्यातून दिसतो.

साहित्यकार हा जाणकाराची भूमिका घेतो. अनेक गोष्टी जवळून न्याहाळतो, अनुभवतो. स्वानुभव व वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा समन्वय साधून लेखक विज्ञान साहित्याचे लेखन करतो. विज्ञान युगातील वास्तव केवळ उघड्या डोळ्यांनी दिसणारे नाही. तर त्या पलिकडे न दिसणारे परंतु विश्वसनीय खात्रीचे विश्वरूप असल्याचे आपण स्वीकारतो. त्या न अनुभवलेल्या पलिकडच्या वास्तवाबद्दल जे भाकित किंवा कल्पना रंजक विवेचन केले जाते, ते साहित्यिकांच्या वैज्ञानिक जाणिवेतून उमगलेल्या भावविश्वाचा शास्त्रीय अविष्कार ज्या साहित्यामध्ये केलेला असतो. त्यांना विज्ञान साहित्य म्हणावे असेही देवरे म्हणतात.

विज्ञान साहित्यात साहित्याचे प्रकार आहेत. कांदबरी, नाटक, कथा चरित्र, आत्मचरित्र वगैरे, पण कथावाङ्मय प्रकार हा जास्त लोकप्रिय आहे. वैज्ञानिक विषय किंवा कल्पना मुळाशी धरून त्याभोवती कथा रचली जाते. त्या कल्पनेला पूरक किंवा साजेशी वैज्ञानिक परिभाषा वापरून ती सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी साहित्यिक परिमाणे उपयोगात आणून कलाकृती निर्माण करीत असतात. साहित्यिंकाच्या कल्पनेतील विश्व प्रत्यक्षात साकारताना दिसत आहे. अर्थात हे विश्व केवळ कल्पना रंजनात्मक नसते. तर भविष्यातील विज्ञानाने बनविलेले वास्तवविश्व असते.

1960 नंतर विज्ञान साहित्य खऱ्या अर्थाने लिहिले जाऊ लागले. मराठीत आज विज्ञानविषयक विपुल लेखन होत आहे. गजानन क्षीरसागर जयंत नारीळीकर, निरंजन घाटे, शुभदा गोगटे, माधुरी शानबाग, अरूण हेबळेकर, डॉ. बाळ फोंडके, सुबोध जावडेकर, लक्ष्मण लोढे, डॉ. अरूण मांडे, डॉ. संजय ढोले असे अनेक नामवंत लेखक विज्ञानावर आधारित कांदबऱ्या व कथा लिहित आहेत. याशिवाय नवीन शोधाचा उपयोग त्यांनी आपल्या कथानकासाठी केला आहे.

प्रसिद्ध वैज्ञानिक जयंत नारळीकर यांनी शास्त्रशुद्ध विज्ञान कथा लिहून मराठीत एक नवे दालन सुरू केले. समाजोमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण रूजविण, विज्ञानाचे फायदे तोटे स्पष्ट करणे हे विज्ञान कथेचे मुख्य उदिष्टय आहे. समाजातील अंधश्रद्धा नष्ट होण्यास तसेच विज्ञानाचा अयोग्य वापर केल्यामुळे होणारे दुष्परिणाम सांगण्यासाठी विज्ञान कथेचा उपयोग होतो. विज्ञानकथेमध्ये स्वतःच्या कल्पना शक्तीची भर घालून रेखाटलेले विज्ञानाचेच चित्र असते. विज्ञान कथेमध्ये वैज्ञानिक शोध त्याचे परिणाम, अज्ञान जग... त्या जगाचे नियम, कायदेकानून, जनुकीय संशोधन त्याचा होणारा परिणाम, मानवाचे भवितव्य असे अनेक विषय येतात.

मराठीत खूप विज्ञान कथा लिहिल्या गेल्या. त्यात लेखकांबरोबर लेखिकांनी ही विज्ञान कथा लिहिल्या आहे. स्त्री लेखिकांमध्ये रेखा बैजल, माधुरी शानबाग, डॉ. शुभदा गोगटे, मेघश्री दळवी अशा काही लेखिकांची नावे घेता येतील. त्यात रेखा बैजल व माधुरी शानभाग यांच्या कथांचा विचार करणे योग्य होईल.

रेखा बैजल यांचे विज्ञानकथा व किडनॅपिंग हे दोन कथा संग्रह प्रसिद्ध आहेत. विज्ञान कथा या संग्रहात एकंदर आठ कथा आहे. या कथांमध्ये वैज्ञानिक संशोधनातील गुढता, साहसी प्रयोग त्यातील ताणतणाव... मानवी मनाची गुंतागुत, भावना यांचे दर्शन घडते. कितीही शोध लागले, मानव कितीही प्रगत झाला तरी तो त्याच्या भावना, विचार थांबवू शकत नाही. सत्याला सामोरे जावेच लागते. यंत्र माणसाची जागा घेऊ शकत नाही. तो त्याच्या सारखे कामे करेल पण त्याच्या सारखे प्रेम देऊ शकणार नाही. आणि माणसाला ही आपली जागा एखाद्या यंत्राने घेणे आवडणार नाही. रेखा बैजल यांच्या 'मम्मी रोबो' या विज्ञान कथेत याचा प्रत्यय येतो. या कथेत शेखर आणि मीनू यांना राजू नावाचा मुलगा असतो. या मुलासाठी वेळ देणे दोघांना अशक्य असते. ते ज्या काळात राहत असतात त्यांचे काही नियम असतात. त्यातील प्रमुख नियम म्हणजे किती मुले होऊ द्यायची आणि कोणाला होऊ द्यायची हे सरकार ठरवणार. आपल्या मुलाचा

एकटेपणा घालविण्यासाठी मिनूला आणखी एक मुल होऊ द्यावंस वाटत. परंतु सरकार परवानगी देत नाही. मुलाच्या गरजा, इच्छा पूर्ण करण्यासाठी ती एक मम्मी रोबो आणते. मम्मी रोबोला सगळ्या सूचना फीड केल्या जातात. पण नंतर मुलगा आपल्याला आईकडून ज्या अपेक्षा असतात. त्या मम्मी रोबोकडून पूर्ण करून घेतो. व त्याला आपल्या आईपेक्षा मम्मी रोबोच जास्त जवळची वाटते. जिवंत माणसापेक्षा तो यंत्रावर अधिक प्रेम करू लागतो. राजूचा अन् रोबोचा भावनिक बंध निर्माण होतो आणि खरी आई बाजूला पडते... याचे आईला दुःख होते.

येणाऱ्या काळाचा धोका या कथेत वर्णन केला आहे. यंत्र, इलेक्ट्रॉनिक साधने माणसाची जागा घेऊ शकणार नाहीत पण माणसे उपलब्ध झाली नाहीत तर यंत्रावरच माणसाप्रमाणे प्रेम करणे भाग पडेल हेच या कथेत सांगितले आहे.

विज्ञान कथेत अशा भविष्याची चाहूल देणाऱ्या कथा आहेत. माणसे झाडे तोडू लागली तर माणसानाच झाडे व्हावे लागेल. किंवा प्राण्यांना माणसाप्रमाणे बोलता आले तर... परग्रहावरचे लोक आपल्या पृथ्वीचा कबजा घेण्यासाठी प्रयत्न करत असतील तर... आपल्या सारखेच दुसरे विश्व अस्तित्वात असेल तर... या सगळ्या तर ची उत्तरे या काल्पनिक कथेत आहेत. कथा काल्पनिक असल्या तरी भविष्यात त्या वास्तववादी होऊ शकतील असा विश्वास आपल्याला वाटतो. हे या कथांचे यश आहे.

'त्रिशंकू' कथा वेगळ्याच विषयाची आहे. कथेचा नायक दिप अंतराळात संशोधनासाठी यानात बसून जातो. त्याची पत्नी मोना, दोन अडीच वर्षाची मुलगी किटू. त्याला आनंदाने निरोप देतात. अंतराळात तीन महिने राहून तो परत येणार असतो. एवढी मोठी संधी मिळाली म्हणून खूश असतो. पण अंतराळात गेल्यावर काही दिवसात यानाच्या वेगावरचे कंट्रोल नाहिसे होते व यानाला पृथ्वीवर आणणे अशक्य होते. यान अवकाशातच फिरत राहते. दिवसामागून दिवस, वर्षामागून वर्ष जातात. आणि दिप तशाच अंतराळात फिरत राहतो. अंतराळात राहिल्यामुळे त्याचे वय वाढत नाही. उलट उंची थोडी कमी होते. जवळजवळ तीस वर्षानी संशोधकांना यानाच्या वेगावर नियंत्रण मिळवता येते. व यान 30 वर्षानी पृथ्वीवर येते. एवढा काळ गेल्याचा दिपवर काहीच परिणाम झालेला नसतो. पण मोना मात्र पंचावन्न वर्षाची झालेली असते. मुलगी किटू मोठी झालेली असते. त्यामुळे दिप व मोना परस्परासमोर आल्यावर त्यांच्यातील अंतर तीव्रतेने लक्षात येते व मोना त्याच्या आयुष्यातून बाजूला होते. त्याची अवस्था त्रिशंकू सारखी होते.

रेखा बैजल यांनी मानवी संशोधनाचे परिणाम मानवावर त्याच्या मनावर कसा परिणाम करतात ते लिहिले आहे. तर माधुरी शानबाग यांनी विज्ञानाचे शोध मानवी जीवनाला पूरक आहेत. पण मानवापेक्षा या शोधाचे महत्त्व जास्त नाही. शेवटी माणसातला माणूसच श्रेष्ठ असतो. असेच त्यांच्या कथातून जाणवते.

माधुरी शानाबाग या भौतिक शास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. त्यांचे विज्ञानाशी घनिष्ठ नाते आहे. विज्ञान हा त्यांच्या अभ्यास चिंतनाचा विषय आहे. पुनर्जन्य व मुंगी उडाली आकाशी, इंद्रधनुष्य, सॅप हे त्यांच्या विज्ञान कथांचे संग्रह आहेत तर ब्रेनव्हेज, तमाच्या तळाशी या विज्ञान कादंबऱ्या आहेत. पुनर्जन्म हा पहिला विज्ञान कथा संग्रह. या संग्रहातील कैफीयत या कथेमध्ये आईच्या मनात उठणारे तरंग नाळेमार्फत गर्भात पोहचतात. मुलाला अहंकारचे बाहकडू गर्भात मिळते. वैज्ञानिक सत्य आणि दैनंदिन जीवनाची सांगड लेखिकेने घातली आहे. अश्वत्थामा अमर आहे. त्याला अमरत्वाचा शाप आहे असे सांगितले जाते. त्याचा संदर्भ घेऊन वैज्ञानिक शोध, सत्य सांगितले आहे. विशिष्ट रसायन वापरून वृद्धत्वाची प्रक्रिया चालू करणारे जीन्स वेगळे काढून त्यांच्या कार्याचा वेग मंदावता आला तर मानवी आयुष्याचा स्पॅन वाढविणे सहज शक्य आहे. याचे चित्रण कथेमध्ये येते.

मुंगी उडाली आकाशी हा त्यांचा अलिकडचा विज्ञान कथासंग्रह. या संग्रहात नऊ कथा आहेत. विज्ञान संशोधन मानवी जगणे सुकर करतात. पण काही वेळा चांगले संशोधनही पैशापायी, प्रतिष्ठापायी माणूस समाजासमोर येऊ देत नाही. पैसा–प्रतिष्ठा पुढे माणुसकी नष्ट होतेच. परंतु माणसाचे जीवन संपण्याचाही प्रकार घडू शकतो हे मुंगी उडाली आकाशी या कथेत दिसते. मधुमेहावरचे नवीन सॉफ्टवेअर करण शोधून काढतो. ज्यामुळे मधुमेहाचे रूग्ण लवकर बरे होऊ शकतील त्यांच्या रक्तातील साखरेवर नियंत्रण राहिल व जरी कमी जास्त झाले तर त्वरीत सूचना मिळतील. ज्यामुळे हजारो रूग्णांना फायदा होणार असतो. पण डॉ. ताटके व त्यांचे सहाकरी त्याचे संशोधन पुढे न येण्यासाठी त्यालाच आजारी पाडतात कारण असे झाले तर त्यांच्याकडे येणाऱ्या रूग्णांची संख्या कमी होईल. त्यांचा धंदा कमी होईल आणि त्यांच्या मुलाबाळांसाठी ते धोक्याचे होईल. पण एक खरे माधुरी शानबाग प्रत्येक कथेचा शेवट चांगला करतात. आशावादी करतात. म्हणून शेवटी डॉक्टरांचे कारस्थान उघड होते असे दाखवले आहे.

सूर राहू दे या कथेतील प्रसिद्ध गायिकेला मीता लोलगेकरला अपघात होतो. तेव्हा तिच्या स्वरयंत्राचा छोटा तुकडा काढून सात्विक हा शास्त्रज्ञ टिशू करचरचे तंत्र वापरून परत नवीन स्वरयंत्र बनवतो. ते स्वरयंत्र एखाद्या मुलीच्या गळ्यात रोपण करता येते कां ? याचा विचार केला जातो. शुंभकर ते स्वरयंत्र आपली मुलगी मितालीच्या गळ्यात रोपण करतो. मुलीचा आवाज अगदी प्रसिद्ध गायिका मीता लोलगेकर सारखाच येतो. तेच स्वर, तेच सूर पण तरीही त्या आवाजात काही कमी आहे असे शुभंकरला वाटते. मीताच्या स्वरातील आर्तता मितालीच्या स्वरात येत नाही. स्वरयंत्र तेच असले तरी भाव ते येत नाहीत. त्याचे कारण सात्विक सांगतो. सूर, लय, ताल, शब्दोच्चार हे स्वरयंत्रातून येत असतील तरी हृदयातील भाव येत नाही. तुमचे संपूर्ण शरीर त्या सूरब्रह्माशी तादात्म्य पावायला हवे. मगच ते गाणे परिपूर्ण होते. कारण गाणे स्वरयंत्रे गात नाहीत तर मेंदूतून ते गायले जाते. शेवटी संगीत हे मेंदूत जन्म घेते. हृदयात उमलते आणि ओठातून बाहेर पडते. स्वरयंत्रे हे फक्त माध्यम आहे. नवीन संशोधनाने अवयवाचे रोपण करता येईल. पण मनाचे, भावनांचे नाही हेच या कथेवरून दिसते.

झाले निरभ्र आकाश या कथेत राधिकाबाई कर्ती बाई, पटवर्धन घराण्याची सर्वेसर्वा. त्यांना दोन मुले असतात.

मोठा शशिकांत, धाकटा रविकांत, शशिकांतला मूल होत नसते. तर रविकांतला दोन मुली असतात.घरातली प्रत्येक गोष्ट राधिकाबाईच्या मर्जीने चालत असते. त्यांना हवे तेच त्या घडवून आणतात. आता सुध्दा त्या सुनेला कृत्रिम गर्भधारणा करवतात. तो गर्भ मुलाचाच असण्याची खात्री करतात. त्यांना आपल्या गोरेपणाचा खूप अभिमान होता. म्हणून गर्भधारणेसाठी त्या गोराच मुलगा निवडतात. सुनेला त्यांच्या इच्छेप्रमाणे मुलगा होतो. पण तो मुलगा काळा, कुरळ्या केसाचा जाड ओठाचा निग्रो सारखा असतो. गर्भधारणा करताना गोऱ्या रंगाचाच मुलाचाच विचार केला होता. पण हे घडले कसे ? तर तो मुलगा अमेरिकेत जन्मला होता. त्याचे वडील भारतीय होते. पण आई निग्रो होती. त्याचे जीन्स या मुलात आले होते. या मुलाला नेण्यापेक्षा एखादा गोरा मुलगा दत्तक घेणे राधिकाबाईना योग्य वाटते. पण शर्वरी तसे करत नाही. ती त्याच बाळाचा सांभाळ करायचे ठरवते. माणसाने कितीही ठरवले तरी जनुक त्याला बदलता येत नाहीत.

या संग्रहातील चांगली कथा म्हणजे फिरूनी नवी जन्मेन मी ही होय. प्रत्येकाला वाटत असते की आपले मुले जगात सर्वात सुंदर असावे. सर्वांनी त्याच्या सौंदर्याची तारिफ करावी. आपण कसेही असलो तरी चालेल, आपले मूल सुंदर असावे. उर्मी आणि सिध्दार्थ यांच्या लग्नाला दोन वर्ष पूर्ण झालेली असतात. दोघेही सॉफ्टवेअर इंजिनिअर असतात. आप्तेष्टापासून दूर नोकऱ्या करीतात. त्यातच तिला दिवस जातात. सिध्दार्थला कॉम्प्युटरमध्ये नवीन संशोधन कळते. त्या संशोधनानुसार शारीरिक जनुकं आपल्याला ठरवता येतात. अशा जनुकाचा उपयोग आपल्याला हवे तसे मूल जन्माला घालण्यासाठी होऊ शकतो. मानवी जीव गर्भावस्थेत असताना या जनुकाचे रोपण करून गर्भ वाढवता येतात. यात डोळ्यांचा रंग, केसांचा रंग, उंची, त्वचेचा रंग शरीराची प्रमाणबध्द ठेवण याची जनुकं त्यांनी वेगळी केली आहेत. या संशोधनाचा उपयोग करून घ्यायचे सिध्दार्थ ठरवतो. उर्मी हो नाही म्हणता तयार होते कोणालाही कळू न देता ते कामासाठी म्हणून अमेरिकेला जातात. तिथे या सगळ्या जनुकांचे रोपण करून येतात. प्रयोग यशस्वी होतो. सिध्दार्थ–उर्मीला अत्यंत सुंदर गोऱ्यापान, निळ्या डोळ्याची, सोनेरी रंगाच्या कुरळ्या केसाची मुलगी होती. मुलीकडे पाहून सर्वांना आनंद होतो. पण सगळे मुलीकडे पाहून ही तुमची मुलगी आहे असे अजिबात वाटत नाही. असे स्पष्ट म्हणतात. यामुळे उर्मी थोडी अपसेट होते व सिध्दार्थला म्हणते मला दुसरे मूल हवे म्हणते कारण या मुलीत त्या दोघांची काहीच खूण नसते. उर्मी म्हणते, आपले मूल म्हणजे आपल्यानंतर या जगात आपण ठेवलेली निशाणी असते. आपल्या मुलात त्यांच्या मुलाचे बालपण त्याचे आजी आजोबा शोधत असतात. आपल्या मुलीत हे दिसत नाही. आपली मुलगी जगात सुंदर आहे पण तिच्यात आपले काहीच नाही. या कथेतही विज्ञानापेक्षा माणसातील भाव, मन, विचार, रंग रूप श्रेष्ठ आहेत हेच दिसते.

शेवटी विज्ञानालाही मर्यादा आहेत. विज्ञानाचा उपयोग एका ठराविक गोष्टीपर्यंत केला तर सुसह्य होतो. पण तो विनाशक ही आहे. त्याचे हे रूप माणसाचे माणूसपण नष्ट करणारे आहे. माणसाला महत्व आहे. यंत्राना नाही. त्या माणूसपणाला समजावून घेणारे, त्याला सुसह्य करणारे संशोधन हवे.

शेवटी निर्मलकुमार फडकुले म्हणतात तेच खरे, की कालच्यापेक्षा आणि आजच्यापेक्षा उद्याचे जग अधिक सुंदर व समर्थ करण्याचा प्रयत्न हे विज्ञानाच्या उपासनेचे मुख्य उदिष्ट्य असले पाहिजे आणि विज्ञान हे स्वाभाविकपणेच त्याच्या सर्वव्यापकत्वामुळे जातपात आणि सामाजिक उच्च–निचतेचे पलिकडे जाते. त्याचा प्रसार देशाचे ऐक्य व भरभराट वाढविण्यासाठी केवळ उपयुक्तच नव्हे तर आवश्यक असते. यासाठी मराठी साहित्याचे माध्यम निश्चितच प्रयत्न करत आहे म्हणूनच मराठीतील विज्ञान साहित्याची वरचेवर भरभराट होत आहे.

### *संदर्भ ग्रंथ सूची*

1.प्रा. शानबाग माधुरी मुंगी उडाली आकाशी नवचैतन्य प्रकाशन मुंबई – 2007
2.संपादक डॉ.देवरे रमेश विज्ञान वेध स्नेहवर्धन प्रकाशन पुणे – 2010
3.संपादक निरंजन घाटे विज्ञान कथाविश्व स्नेहवर्धन प्रकाशन पुणे – 2006
4.प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते
5.रेखा बैजल विज्ञान कथा ज्ञानदत्त प्रकाशन पुणे, दु.आ. 2007
6.संपादक निरंजन घाटे मराठीतील निवडक स्नेहवर्धन प्रकाशन पुणे – 2001
विज्ञान कथा

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net